आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

८ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- हरियाणात भाजपाला तर जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडीला स्पष्ट बहुमत
- महाराष्ट्रातल्या दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचं उद्या प्रधानमंत्र्याच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन
- भौतिकशास्त्रातला यंदाचा नोबेल पुरस्कार जॉन जे. हॉपफिल्ड आणि जेफ्री ई. हिंटन या वैज्ञानिकांना जाहीर

  **आणि**
- ७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं राष्ट्रपतींच्या हस्ते नवी दिल्लीत वितरण, ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**<><><><><>**

**जम्मू आणि काश्मिर** तसंच हरियाणा विधानसभा निवडणूकीची मतमोजणी आज झाली.

जम्मू काश्मीरमधे ९० विधानसभा मतदारसंघापैकी ४२ ठिकाणी नॅशनल कॉन्फरन्सचे उमेदवार विजयी झाले असून भाजपाचे उमेदवार २९ ठिकाणी विजयी झाले आहेत. काँग्रेस ६, पीडीपी ३ तर जेपीसी, सीपीएम आणि आपचे उमेदवार प्रत्येकी एका ठिकाणी विजयी झाले आहेत. सात ठिकाणी अपक्ष उमेदवारांनी विजय मिळवला आहे. माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला बडगाम आणि गंदेरबाल या दोन्ही मतदारसंघातून विजयी झाले आहेत.

**हरियाणात** ९० मतदारसंघांपैकी ४८ ठिकाणी भाजपा उमेदवार तर ३६ ठिकाणी काँग्रेस उमेदवार विजयी झाले आहेत. भारतीय लोकदलाचे उमेदवार दोन

ठिकाणी तर अपक्ष उमेदवार तीन ठिकाणी विजयी झाले आहेत. एका मतदारसंघात काँग्रेसचा उमेदवार आघाडीवर आहे. कुस्तीपटू विनेश फोगाट जुलाना मतदारसंघातून काँग्रेसकडून विजयी झाल्या आहेत. तसंच मुख्यमंत्री नायबसिंग सैनी हे लडवा मतदारसंघातून विजयी झाले आहेत.

**<><><><><>**

हरयाणातलं भाजपाचं यश हा सुशासन आणि विकासाच्या राजकारणाचा विजय असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. हरयाणातल्या जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्यात कसलीही कसर सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. या विजयाचं श्रेय समर्पण भावनेनं अथक परिश्रम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचं असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

जम्मू-कश्मीरमधून ३७० वं कलम हटवल्यानंतर पहिल्यांदाच झालेल्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदान झालं, आणि तिथल्या जनतेनं लोकशाहीवरचा विश्वास दाखवून दिला, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. भाजपाच्या तिथल्या कामगिरीबद्दल आपल्याला अभिमान वाटतो, असं त्यांनी म्हटलय. नॅशनल कॉन्फरन्सची या निवडणुकीतली कामगिरी कौतुकास्पद असल्याचही त्यांनी म्हटलं आहे.

भाजपाला कौल दिल्याबद्दल भाजपा नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हरयाणातल्या जनतेविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. काँग्रेसच्या नकारात्मक आणि विभाजनवादी राजकारणाला जनतेनं पूर्णपणे नाकारलं असल्याची टीका त्यांनी केली. जम्मू-कश्मीर विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या मतांची टक्केवारी वाढली असल्याचं सांगत पक्षाच्या तिथल्या कामगिरीचंही त्यांनी कौतुक केलं.

हरयाणातल्या जनतेनं काँग्रेसला नाकारलं असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय मंत्री आणि हरयाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी बातमीदारांशी बोलताना

दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या धोरणांचा सकारात्मक परिणाम राज्यातल्या जनतेला दिसत असल्याचा संदेश मतदारांनी दिला आहे, असं ते म्हणाले.

हरयाणामधे जातीयवादाचा पराभव आणि विकासाचा विजय झाला असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. तर हरयाणाच्या जनतेने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत खोटा प्रचार करणाऱ्यांना नाकारलं असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. हरियाणात जे घडलं तेच नोव्हेंबरमध्ये महाराष्ट्रात घडणार आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

तर जम्मू-कश्मिरमधे भाजपा आणि मित्रपक्षांच्या राजकारणाला जनतेनं नकार दिला असून, आशा आणि प्रगतीसाठी कौल दिला आहे, अशी प्रतिक्रिया नॅशनल कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष उमर अब्दुल्ला यांनी व्यक्त केली आहे. गंदरबल इथं बातमीदारांशी बोलताना त्यांनी सांगितलं की, येत्या काही दिवसात मित्रपक्षांशी चर्चा करुन पुढचा कृती कार्यक्रम ठरवला जाईल.

दरम्यान, उमर अब्दुल्ला हे नव्या आघाडी सरकारचे मुख्यमंत्री असतील, असं  नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुक अब्दुल्ला यांनी जाहीर केलं आहे.

दुसऱ्या बाजूला पीडीपीच्या अध्यक्ष मेहबूबा मुफ्ती यांनी पक्षाचा पराभव मान्य केला आहे. मात्र आपल्या पक्षानं जिंकलेल्या जागा पुरेश्या नसल्या तरी ताकद कायम आहे, असंही त्यांनी म्हटलं आहे. जम्मू कश्मिरच्या जनतेनं स्थीर सरकारला पसंती दिली असून, त्यासाठी त्यांनी नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडीवर विश्वास दाखवला आहे, असं त्या म्हणाल्या.

हरयाणातल्या निकालामुळे काँग्रेस पक्ष निराश झालेला नाही, असं काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी म्हटलं आहे. हरयाणा आणि

महाराष्ट्रातली परिस्थिती वेगळी असून, महाराष्ट्रात महाविकास आघाडीचच सरकार येईल, असं त्यांनी म्हटलं आहे.

हरयाणा विधानसभा निवडणुकीचे निकाल आश्चर्यकारक आणि धक्कादायक असून, हा व्यवस्थेचा विजय आणि लोकशाहीचा पराभव असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या १० नव्या शासकीय महाविद्यालयांचं उद्घाटन उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे होणार आहे. मुंबई, अंबरनाथ, नाशिक, जालना, बुलडाणा, हिंगोली, वाशिम, अमरावती, भंडारा आणि गडचिरोलीमध्ये ही महाविद्यालयं आहेत. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीसह केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी.नड्डा, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांसह वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे.

<><><><><>

राज्यातल्या शाळांमध्ये ४ हजार ८६० विशेष शिक्षकांची पदं निर्माण करायला राज्य सरकारनं आज मंजुरी दिली. त्यातल्या २ हजार ९८४ पदांवर सध्या कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेल्या शिक्षकांचं समयोजन केलं जाणार आहे. त्यांना शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रतेनुसार समकक्ष वेतनश्रेणी लागू असेल.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज जर्मनीचे संरक्षण मंत्री बोरिस पिस्टोरियस यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केली. संरक्षण सामुग्रीचं उत्पादन आणि

पुरवठा साखळीत सहकार्याविषयी यावेळी बोलणं झाल्याचं राजनाथ सिंह यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे लिहिलं आहे.

**<><><><>**

भौतिकशास्त्रातला यंदाचा नोबेल पुरस्कार जॉन जे. हॉपफिल्ड आणि जेफ्री ई. हिंटन या वैज्ञानिकांना जाहीर झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता विकासासाठी यांत्रिक शिक्षणात केलेल्या संशोधनाबद्दल हा पुरस्कार त्यांना मिळाल्याचं रॉयल स्वीडीश अकॅडेमी ऑफ सायन्सेसने जाहीर केलं आहे. जॉन हॉपफिल्ड यांनी प्रतिमा आणि इतर विदा प्रणाली साठवून ठेवण्याकरता संलग्न मेमरीची निर्मिती केली आहे. उपलब्ध माहितीतून वैशिष्ट्यं ओळखून काढून प्रतिमांमधून ते शोधण्याची कृत्रिम बुद्धिमत्तेची पद्धत जेफ्री हिंटन यांनी तयार केली आहे. या दोन्ही संशोधकांनी भौतिकशास्त्रातल्या पद्धती आणि संकल्पनांचा वापर या निर्मितीत केला.

**<><><><>**

चित्रपटसृष्टीतल्या सर्वात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्काराने आज ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचा सन्मान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झाला. ७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण सोहळ्यात राष्ट्रपतींनी इतरही कलाकार आणि चित्रपटांना सन्मानित केलं. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन आणि इतर यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना राष्ट्रपतींनी दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल मिथुन चक्रवर्ती यांचं अभिनंदन केलं. चित्रपटसृष्टीला त्यांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख त्यांनी केला. तसंच, राष्ट्रीय पुरस्कार पटकावलेल्या चित्रपटांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

**होल्ड - राष्ट्रपती**

अश्विनी वैष्णव यांनी चित्रपट व्यवसायाच्या प्रगतीसाठी सरकार करत असलेली कामं अधोरेखित केली. कौशल्य विकास, पायाभूत सुविधा आणि सुलभीकरणावर सरकार भर देत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राज्यातल्या ७ हजार ६०० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची पायाभरणी दूरदृश्य प्रणालीद्वारे करणार आहेत. त्यात नागूपर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विस्तार, शिर्डी विमानतळाच्या नव्या एकात्मिक टर्मिनल इमारतीचं भूमीपूजन यांचा समावेश आहे. याशिवाय मुंबईत Institute of Skills Mumbai आणि विद्या समीक्षा केंद्राचं उद्घाटन प्रधानमंत्री करणार आहे.

**<><><><><>**

अयोध्येत राम जन्मभूमी मंदिर परिसरात महाराष्ट्र भक्त सदन इमारत बांधणीचं भूमिपूजन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण व उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांच्या प्रमुख उपस्थितीत झालं.

**<><><><><>**

आशियाई टेबल टेनिसमध्ये अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला संघ उपांत्य फेरीत पोचला आहे. कझाकस्तानमध्ये झालेल्या उपांत्य पूर्व फेरीत भारतीय संघानं दक्षिण कोरियाचा पराभव केला. मनिका बत्राच्या नेतृत्त्वाखाली भारतानं कोरियाच्या संघाला ३-२ असं पराभूत केलं. त्यामुळं स्पर्धेतलं भारताचं पहिलवहिलं पदक निश्चित झालं आहे. उपांत्य फेरीत भारताचा सामना उद्या जपान सोबत होणार आहे.

**<><><><><>**